# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास मंडळ

दूरध्वनी : २६६०९४७ Website:www.sgbau.ac.in/Student Development/Letter Email:avinashasnare@sgbau.ac.in


**आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव (सांस्कृतिक स्पर्धा) प्रवेशिका स्विकृतीची अंतीम तिथी १० सप्टेंबर, २०१७**

क्र.संगाबाअवि-१३/६३/२०१७
दिनांकः **०८.०९.२०१७**

प्रति,
प्राचार्य/विभाग प्रमुख/प्रभारी अधिकारी,
सर्व संलग्नित महाविद्यालये/पदव्युत्तर शैक्षणिक विभाग/
पद्व्युत्तर शैक्षणिक विभागांचे प्रशासकीय केंद्र,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**विषयः सत्र २०१७-२०१८ आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव (सांस्कृतिक) स्पर्धेत सहभागी होण्याकरीता प्रवेश अर्ज, नोंदणी शुल्क रु.५००/- व प्रवेश शुल्कासह पाठविण्याबाबत.**
**संदर्भः** या कार्यालयाचे पत्र क्र.संगाबाअवि-१३/५८/२०१७ दिनांक २४.०८.२०१७

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव (सांस्कृतिक) स्पर्धेत सहभागी होण्याकरीता प्रवेश अर्ज, नोंदणी शुल्क रु.५००/- व प्रवेश शुल्कासह दिनांक १० सप्टेंबर, २०१७ पर्यंत किंवा पूर्वी पोहचतील अशा बेताने पाठविण्यात यावे असे कळविण्यात आले आहे.

शनिवार दिनांक ०९.०९.२०१७ व रविवार दिनांक १०.०९.२०१७ हे शासकीय सुट्टीचे दिवस असल्यामुळे या दिवशीसुध्दा वित्त विभागाचे रोख स्विकृती विभाग (**Cash Counter**) व विद्यार्थी विकास विभागाचे कार्यालय सुध्दा कार्यालयीन वेळेपर्यंत सुरु ठेवण्यात आले आहे. याबाबत कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी ही विनंती.

आपणास पुनःश्च कळविण्यात येते की, आपले महाविद्यालय आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव (सांस्कृतिक) स्पर्धेत ज्या कलाप्रकारांमध्ये सहभागी होणार आहे त्या कलाप्रकारामध्ये (√) नोंद करुन सदर प्रवेश अर्ज प्राचार्यांचे स्वाक्षरीनिशी, नोंदणी शुल्क **रु.५००/- व आवश्यक त्या प्रवेश शुल्काचा "कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती"** यांचे नांवे काढलेल्या एकत्रित धनाकर्षाव्दारे किंवा धनादेशाव्दारे वित्त विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे जमा करावा. तसेच जमा करण्यात आलेल्या रकमेबाबतची पावती व प्रवेश अर्ज **संचालक, विद्यार्थी विकास विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ** यांचे कार्यालयात **दिनांक १०.०९.२०१७** पर्यंत किंवा पुर्वी पोहचतील अशा बेताने पाठविण्यात यावेत.

**आपणास विनंती करण्यात येते की, प्रवेश अर्ज हा महाविद्यालयामार्फत प्राचार्यांचे स्वाक्षरीनिशी, विना नोंदणी शुल्क रु.५००/- व आवश्यक त्या प्रवेश शुल्काशिवाय नसल्यास किंवा विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास ते स्वीकारण्यात येणार नाहीत याची कृपया कटाक्षाने नोंद घ्यावी.**

धन्यवाद,

आपला,

(डॉ.अविनाश असनारे)
प्र-संचालक,
विद्यार्थी विकास विभाग,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रतिलिपीः**
०१. मा.कुलगुरु, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
०२. मा.कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
०३. मा.वित्त व लेखा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती